CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । सोमवार, ७ ऑक्टोबर २०२४

म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई

# सिडकोच्या गृहयोजनेच्या अर्जनोंदणीस मुदतवाढ

## खारघरमध्ये अतिरिक्त १९० सदनिका

सिडकोच्या खारघर येथील स्वप्नपूर्ती, व्हॅलीशिल्प आणि वास्तुविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील ६८९ सदनिका २७ ऑगस्ट २०२४ रोजी विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. आता या गृहनिर्माण योजनेंतर्गत १९० अतिरिक्त सदनिकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेसाठी ऑनलाइन अर्जनोंदणी करण्यास २५ ऑक्टोबर २०२४पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

सिडकोच्या खारघर नोडमधील स्वप्नपूर्ती, व्हॅलीशिल्प आणि वास्तुविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील ६८९ सदनिका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटांसाठी आहेत. यांपैकी, स्वप्नपूर्ती गृहसंकुलातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ९३, वास्तू




विहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील मध्यम उत्पन्न गटासाठी ४६ आणि उच्च उत्पन्न गटासाठी ५१ अतिरिक्त सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता स्वप्नपूर्ती गृहसंकुलातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी एकूण १३५, वास्तू विहार-सेलिब्रेशन गृहसंकुलातील मध्यम उत्पन्न गटासाठी एकूण ५६ आणि उच्च उत्पन्न गटासाठी एकूण ७४ सदनिका उपलब्ध झाल्या आहेत.

या सदनिकांसाठी ऑनलाइन अर्जनोंदणी करण्यास २५ ऑक्टोबर रोजी रात्री आठ वाजेपर्यंत व अनामत रकमेचा भरणा करण्यासाठी ३० ऑक्टोबर रोजी रात्री २३.५९ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून संगणकीय सोडत १३ नोव्हेंबर रोजी ११ वाजता पार पडणार आहे.

ऑनलाइन अर्जनोंदणी, सुधारित वेळापत्रक व योजनेचा सविस्तर तपशील https://lottery.cidcoindia.com या वेबसाइटवर मिळेल. या योजनेसोबतच घणसोली, खारघर व कळंबोली येथील सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेतील उपलब्ध घरे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली होती. या योजनेतील संगणकीय सोडत पूर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणेच १० ऑक्टोबर रोजी पार पडेल, असे सिडकोने कळवले आहे.

आपलं महानगर रविवार ६ ऑक्टोबर २०२४

# नवरात्रोत्सवात मोदींचे महाराष्ट्रात विकासपर्व

## मुंबईतील भूमिगत मेट्रोच्या लोकार्पणासह ठामपाच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन

प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा

मुंबई /ठाणे । आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी दिवसभर महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत ३३हजार कोटींहून अधिक विकासकामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन करीत नवरात्रोत्सवादरम्यान विकासपर्व सुरू केले. पंतप्रधान मोदी यांनी शनिवारी सकाळी वाशिम येथे बंजारा विरासत संग्रहालयाचे उद्घाटन केले. त्यानंतर दुपारी ठाणे महानगरपालिकेच्या नव्या इमारतीच्या भूमिपूजनासह नवी मुंबईतील नैना पायाभूत विकासकामे सुविधांचे भूमिपूजन केले. तसेच संध्याकाळी मुंबईतील पहिल्या भूमिगत मेट्रोचे लोकार्पण मार्गी लावत मराठी राजभाषा दिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहत आगामी विधानसभा निवडणुकांसाठी प्रचाराचे रणशिंगही या माध्यमातून फुंकले. पान २




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी राज्यातील ३३ हजार कोटींपेक्षा अधिकच्या विकासकामांचे लोकार्पण, भूमिपूजन करण्यात आले. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आदी उपस्थित होते.

### महाराष्ट्रासाठी ३३ हजार कोटींपेक्षा अधिक विकासकामे

- कुलाबा-वांद्रे-सीप्झ : मुंबई मेट्रो मार्गिका - ३ टप्पा-१ (आरे जेव्हीएलआर ते वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स स्थानक) शुभारंभ
- पूर्व मुक्त मार्ग विस्तार छेडानगर, घाटकोपर ते आनंद नगर, ठाणे प्रकल्पाचे भूमिपूजन
- नैना नगररचना परियोजनेंतर्गत विविध पायाभूत सुविधा कामांचे भूमिपूजन
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सत्कार
- ठाणे पालिकेच्या नव्या इमारतीचे भूमिपूजन
- वाशिम बंजारा विरासत संग्रहालय उद्घाटन
- २३ हजार ३०० कोटींच्या कृषी आणि पशुसंवर्धन उपक्रमांचा आरंभ


(पान १ वरुन)

# नवरात्रोत्सवात मोदींचे महाराष्ट्रात विकासपर्व

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांच्या महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले की, विरोधकांची मविआ ही महाविकास आघाडी नसून महाविरोध आघाडी आहे. महाविकास आघाडीने नेहमी विकासकामांना विरोध केला. काँग्रेस जिथे राज्य करते तिथे तबाही करते. काँग्रेसने देशाला गरीब केले आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्याला काँग्रेसने उद्ध्वस्त केले. महाराष्ट्राची अवस्था खराब केली. काँग्रेसने जिथे जिथे राज्य केले तिथे त्यांनी नासधूस केली आहे. काँग्रेससोबत जाऊन काही छोटे मोठे पक्षसुद्धा काँग्रेसच्या ध्रुवीकरणाच्या राजकारणात साथ देत आहेत. काँग्रेसचे काही नवे चेले मतांसाठी वक्फ बोर्डाच्या कायद्याला विरोध करीत आहेत. काँग्रेसचे नवीन चेले आमच्या वक्फच्या विधेयकाला विरोध करीत आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा काँग्रेस वारंवार अपमान करीत आहे, पण काँग्रेसचे काही चेले त्यांच्यामागून हुजरी करतात. सावरकरांचा अपमान सहन करतात. नवीन मतदारांना आकर्षित करण्यासाठी काँग्रेसचे चेले काँग्रेसच्या चुकांना नजरअंदाज करीत आहेत, असे म्हणत त्यांनी शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवरही निशाणा साधला.

**बंजारा संतांकडून आध्यात्मिक क्षेत्राला ऊर्जा - पंतप्रधान मोदी**

बंजारा समाजाने देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्वाची भूमिका निभावली. देशाच्या विकासासाठी प्रत्येक क्षेत्रात या समाजाने काम केले. समाजाने खूप संत दिले. या संतांनी देशाच्या आध्यात्मिक क्षेत्राला ऊर्जा दिली. बंजारा विरासत संग्रहालयामुळे समाजाची महान संस्कृती, प्राचीन परंपरा देशाच्या नवीन पिढीला परिचित होईल, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी केले. वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी येथे प्रधानमंत्र्यांच्या हस्ते बंजारा विरासत संग्रहालयाचे उद्घाटन, किसान सन्मान संमेलन तथा विविध विकासकामांचे लोकार्पण, लाभाचे वितरण झाले. त्यावेळी पंतप्रधान बोलत होते. यावेळी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंग चौहान, मत्स्यपालन व पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, पालकमंत्री संजय राठोड, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री धनंजय मुंडे, खा.अनुप धोत्रे, आ.चंद्रशेखर बावनकुळे, आ.निलय नाईक, आ.भावना गवळी, आ.किरण सरनाईक, आ.लखन मलिक, आ.वसंत खंडेलवाल, जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे आदी उपस्थित होते.




सकाळ मुंबई, सोमवार, ७ ऑक्टोबर २०२४

# मेट्रो स्थानकाच्या व्यावसायिक जागेसंबंधी सिडकोची कार्यशाळा

खारघर, ता. ५ (बातमीदार) : सिडकोतर्फे सोमवारी सात आक्टोबर रोजी सकाळी साडे अकरा वाजता खारघरमधील सेंट्रल पार्क स्थानक येथे नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. एकाच्या स्थानकांवरील व्यावसायिक गाळ्यांबाबत कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले आहे.

सिडकोतर्फे मेट्रो मार्ग क्र. १ वरील स्थानकांवर वाणिज्यिक जागा विकसित करण्यात आल्या आहेत. या वाणिज्यिक जागांच्या क्षमतांचा वापर चलनीकरणासाठी करण्याकरिता या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये सहभागी होणाऱ्यांना सिडकोच्या मेट्रो मार्ग क्र. एक ची ओळख, सरेखन आणि मुंबई महानगर प्रदेशातील प्रादेशिक कनेक्टिव्हिटीकरिता त्याचे महत्त्व, मेट्रो स्थानकांवर भाडेपट्ट्यावर उपलब्ध असलेल्या किरकोळ व वाणिज्यिक जागांकरिता अनुज्ञापन संधी, निविदा प्रक्रिया, पात्रतेचे निकष, इ. मुद्द्यांबद्दल माहिती देण्यात येणार आहे. तसेच निविदाकारांकडून देण्यात येणाऱ्या सूचनांवरही चर्चा करण्यात येणार आहे. कार्यशाळेनंतर मेट्रो स्थानकांना भेट देण्यात येणार आहे. प्रत्येक मेट्रो स्थानकावर व्यावसायिक गाळे उपलब्ध करण्यात आली आहे.




लोकमत

मुंबई, रविवार, दि. ६ ऑक्टोबर २०२४

# शिल्लक घरांची १३ नोव्हेंबरला काढणार सोडत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई** : सिडकोच्या माध्यमातून स्वप्नपूर्ती, व्हॅलिशिल्प आणि वास्तुविहार सेलिब्रेशन या गृहसंकुलातील शिल्लक ६८१ घरांची योजना १७ ऑगस्ट रोजी जाहीर केली होती. आता या योजनेत याच प्रकल्पांतील आणखी १९० घरांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार संगणकीय सोडतीची तारीखही पुढे ढकलली असून आता ही सोडत १३ नोव्हेंबर रोजी होणार असल्याचे सिडकोने कळविले आहे. यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल, अल्प उत्पन्न, मध्यम उच्च उत्पन्न गटांच्या ६८१ सदनिकांचा समावेश आहे.

सकाळ मुंबई, रविवार, ६ ऑक्टोबर २०२४

# सिडको सोडतीत अतिरिक्त सदनिका

वाशी, ता. ५ (बातमीदार) : सिडकोकडून खारघर येथील स्वप्नपूर्ती, व्हॅलीशिल्प आणि वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील ६८९ सदनिका विक्रीकरिता नुकत्याच उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये आता गृहनिर्माण योजनेंतर्गत १९० अतिरिक्त सदनिकांचा समावेश आहे.

या योजनेसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणी करण्यास २५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. दरम्यान ऑगस्ट २०१८च्या लॉटरीमध्ये महागृहनिर्माण योजनेतील संगणकीय सोडत पूर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणेच १० ऑक्टोबर २०२४ रोजी जाहीर होणार आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

**प्रहार** मुंबई | रविवार, ६ ऑक्टोबर २०२४

# सिडको १९० अतिरिक्त सदनिका करणार उपलब्ध

## ऑनलाइन अर्ज नोंदणीसाठी २५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

◆ **मुंबई (वार्ताहर):**




सिडको महामंडळातर्फे २७ ऑगस्ट रोजी सिडकोच्या खारघर येथील स्वप्नपूर्ती, व्हॅलीशिल्प आणि वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील ६८९ सदनिका विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. सिडको महामंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आता, सदर गृहनिर्माण योजनेंतर्गत १९० अतिरिक्त सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या असून सदर योजनेसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणी करण्यासाठी दि. २५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ करण्यात आली आहे. अनामत रकमेचा भरणा करण्याकरिता ३० ऑक्टोबर रोजी रात्री २३.५९ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून संगणकीय सोडत १३ नोव्हेंबर रोजी ११.०० वाजता पार पडणार आहे. ऑनलाइन अर्ज नोंदणी, सुधारित वेळापत्रक व योजनेचा सविस्तर तपशील जाणून घेण्याकरिता <https://lottery.cidcoindia.com> हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

उपरोक्त योजनेसोबतच घणसोली, खारघर व कळंबोली येथील सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेतील उपलब्ध घरे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली होती. सदर योजनेतील संगणकीय सोडत पूर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणेच १० ऑक्टोबर रोजी पार पडेल याची कृपया अर्जदारांनी नोंद घ्यावी.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

मुंबई, रविवार
6.10.2024

# नवभारत

### सिडको की आवासीय योजना के तहत

# खारघर में अतिरिक्त 190 फ्लैट उपलब्ध, पंजीकरण अवधि बढ़ी

■ **नवी मुंबई** (सं). सिडको के खारघर के स्वप्नपूर्ति, वैली शिल्प और वास्तु विहार-सेलिब्रेशन आवास परिसरों में 689 फ्लैट सिडको कॉर्पोरेशन द्वारा बिक्री के लिए उपलब्ध कराए गए थे. सिडको कॉर्पोरेशन द्वारा लिए गए निर्णय के अनुसार, उक्त आवास योजना के तहत और 190 अतिरिक्त फ्लैट उपलब्ध कराए गए हैं और इस योजना के लिए ऑनलाइन आवेदन पंजीकरण की समय-सीमा 25 अक्टूबर 2024 तक बढ़ा दी गई है.यह योजना 27 अगस्त को सिडको द्वारा शुरू की गई थी. योजना के तहत, खारघर नोड में ड्रीम फुलफिलमेंट, वैली शिल्प और वास्तु विहार-सेलिब्रेशन आवास परिसरों में 689 फ्लैट आर्थिक रूप से कमजोर वर्गों, निम्न, मध्यम व उच्च आय समूहों के लिए उपलब्ध कराए गए थे. इनमें से स्वप्नपूर्ति आवास परिसर में आर्थिक रूप से कमजोर वर्ग के लिए 93, मध्यम आय46 और वास्तु विहार-सेलिब्रेशन आवास परिसर में उच्च आय वर्ग के लिए 51 अतिरिक्त फ्लैट उपलब्ध कराए गए हैं.



### बढ़ाई गयी रजिस्ट्रेशन की समय-सीमा

फ्लैटों के लिए ऑनलाइन आवेदन पंजीकरण की समय-सीमा 25 अक्टूबर 2024 को रात 20.00 बजे तक और जमा राशि के भुगतान 30 अक्टूबर 2024 को रात 23.59 बजे तक बढ़ा दी गई है और कम्प्यूटरी कृत ड्रा 13 नवंबर 2024 को सुबह 11.00 बजे आयोजित किया जाएगा. ऑनलाइन आवेदन पंजीकरण और योजना के विवरण के लिए वेबसाइट https://lottery.cidcoindia. com उपलब्ध कराई गई है. साथ-साथ, सिडको की महागृह निर्माण योजना में घणसोली, खारघर और कलंबोली में उपलब्ध घरों को बिक्री के लिए उपलब्ध कराया गया था.




पुण्य नगरी रविवार, ६ ऑक्टोबर २०२४ । मुंबई

# सिडको गृहनिर्माण योजनेत अतिरिक्त १९० सदनिका

। बेलापूर : सिडकोच्या वतीने २७ ऑगस्टला खारघर येथील स्वप्नपूर्ती, व्हॅलीशिल्प आणि वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील ६८९ सदनिका विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. आता गृहनिर्माण योजनेंतर्गत १९० अतिरिक्त सदनिका सिडकोकडून उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या योजनेसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणी करण्यास २५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

सिडकोतर्फे ऑगस्ट गृहनिर्माण योजनेअंतर्गत सिडकोच्या खारघर नोडमधील स्वप्नपूर्ती, व्हॅलिशिल्प आणि वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील ६८९ सदनिका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटांकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यापैकी, स्वप्नपूर्ती गृहसंकुलातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता ९३, वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील मध्यम उत्पन्न गटाकरिता ४६ आणि उच्च उत्पन्न गटाकरिता ५१ अतिरिक्त सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे आता स्वप्नपूर्ती गृहसंकुलातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता एकूण १३५, वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलातील मध्यम उत्पन्न गटाकरिता एकूण ५६ आणि उच्च उत्पन्न गटाकरिता एकूण ७४ सदनिका उपलब्ध झाल्या आहेत.

घणसोली, कळंबोली, खारघरची लॉटरी १० ऑक्टोबरलाच ऑगस्ट २०१८ च्या लॉटरीमध्ये घणसोली, खारघर व कळंबोली येथील सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेतील घरे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली होती. या योजनेतील संगणकीय सोडत पूर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणेच १० ऑक्टोबरला पार पडणार असल्याचे सिडकोने स्पष्ट केले.

लोकमत Hello Navi Mumbai
Page No. 1 Oct 06, 2024

# बेलापूर-पेंधर मेट्रोतून ४० लाख प्रवाशांचा प्रवास

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** सिडकोच्या माध्यमातून गेल्या वर्षी सुरू करण्यात आलेल्या बेलापूर ते पेंधरदरम्यानच्या मेट्रो सेवेला प्रवाशांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. शनिवारी प्रवाशांनी ४० लाखांचा टप्पा गाठला आहे.

सिडकोचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून नवी मुंबई मेट्रोचा उल्लेख केला जातो. विविध कारणांमुळे दीर्घकाळ रखडलेल्या मेट्रोचा पहिला टप्पा गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात प्रवाशांसाठी खुला केला आहे. पहिल्या सहा महिन्यांतच म्हणजेच एप्रिल २०२४ पर्यंत जवळपास १९ लाख ६० हजार प्रवाशांनी मेट्रोचा प्रवास केला. ५ ऑक्टोबर रोजी प्रवाशांची एकूण संख्या ४० लाख इतकी झाली आहे.



## 'या' सुविधांमुळे दिलासा

मेट्रोच्या तिकीट दरावरून प्रवाशांची सुरुवातीपासून तक्रार होती. तसेच, मासिक पास आणि रिटर्न तिकिटाची सुविधा नसल्याने प्रवाशांना पुन:पुन्हा तिकिटाच्या रांगेत उभे राहावे लागत असे. प्लॅटफॉर्मवर पंखे तसेच पाण्याची सुविधा नसल्याच्याही तक्रारी होत्या. या तक्रारीच्या अनुषंगाने सिडकोने सकारात्मक कार्यवाही केली आहे. त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

नवराष्ट्र | मुंबई, ६ ऑक्टोबर २०२४

### सुवर्णसंधी : २५ ऑक्टोबरपर्यंत ऑनलाईन नोंदणीस मुदत

# गृहनिर्माण अर्ज नोंदणीस वाढ

नवी मुंबई, (वा.) सिडको महामंडळातर्फे दिनांक २७ ऑगस्ट २०२४ रोजी सिडकोच्या खारघर येथील स्वप्नपूर्ती, व्हॅलीशिल्प आणि वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील ६८९ सदनिका विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. सिडको महामंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आता सदर गृहनिर्माण योजनेंतर्गत १९० अतिरिक्त सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या असून सदर योजनेसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणी करण्यास दिनांक २५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

उपरोक्त योजनेसोबतच घणसोली, खारघर व कळंबोली येथील सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेतील उपलब्ध घरे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली होती. सदर योजनेतील संगणकीय सोडत पूर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणेच १० ऑक्टोबर २०२४ रोजी पार पडेल याची कृपया अर्जदारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन सिडको महामंडळाने सदर गृहनिर्माण योजनेसाठी सर्व इच्छुक अर्जदारांना केले आहे.

## सिडको योजनेंतर्गत अतिरिक्त १९० सदनिका उपलब्ध

सिडकोतर्फे २७ ऑगस्ट रोजी प्रारंभ करण्यात आलेल्या ऑगस्ट २०२४ गृहनिर्माण योजनेअंतर्गत सिडकोच्या खारघर नोडमधील स्वप्नपूर्ती, व्हॅलिशिल्प आणि वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील ६८९ सदनिका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटांकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यांपैकी, स्वप्नपूर्ती गृहसंकुलातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता ९३, वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील मध्यम उत्पन्न गटाकरिता ४६ आणि उच्च उत्पन्न गटाकरिता ५१ अतिरिक्त सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे आता स्वप्नपूर्ती गृहसंकुलातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता एकूण १३५, वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलातील मध्यम उत्पन्न गटाकरिता एकूण ५६ आणि उच्च उत्पन्न गटाकरिता एकूण ७४ सदनिका उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे स्वत:च्या घराकरिता इच्छुकांना दिलासा मिळाला आहे.

## डिपॉझिट भरण्याची अंतिम तारीख ३० ऑक्टोबर




या सदनिकांकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणी करण्यास २५ ऑक्टोबर रोजी रात्री २०.०० वाजेपर्यंत व अनामत रकमेचा भरणा करण्याकरिता ३० ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री २३.५९ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून संगणकीय सोडत १३ नोव्हेंबर २०२४ रोजी ११.०० वाजता पार पडणार आहे. ऑनलाइन अर्ज नोंदणी, सुधारित वेळापत्रक व योजनेचा सविस्तर तपशील जाणून घेण्याकरिता https://lottery.cidcoindia.com हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

दैनिक 'धनुषधारी' (उल्हासनगर-महा.) 6 अक्टूबर 2024

दैनिक धनुषधारी

www.dailydhanushdhari.com

## स्वप्नपूर्ति, वैलीशिल्प और वास्तुविहार-सेलिब्रेशन हाउसिंग कॉम्प्लेक्स में

# सिडको ने उपलब्ध करवाये 190 अतिरिक्त फ्लैट आवेदन की तिथि 25 अक्टूबर तक बढ़ायी गयी

नवी मुंबई (सनी पांडेय) ।27 अगस्त 2024 को खारघर के स्वप्नपूर्ति, वैलीशिल्प और वास्तुविहार-सेलिब्रेशन आवास परिसरों में 689 फ्लैट सिडको द्वारा बिक्री के लिए उपलब्ध कराए गए थे. जिसके बाद अब सिडको द्वारा लिए गए निर्णय के अनुसार, उक्त आवास योजना के तहत 190 अतिरिक्त फ्लैट उपलब्ध कराए गए हैं. इस योजना के लिए ऑनलाइन आवेदन पंजीकरण की समय सीमा भी 25 अक्टूबर 2024 तक बढ़ा दी गई है।

मिली जानकारी के अनुसार 27 अगस्त, 2024 को सिडको द्वारा शुरू की गई अगस्त 2024 आवास योजना के तहत, सिडको के खारघर नोड में स्वप्नपुर्ति, वेलिशिल्प और वास्तुविहार-सेलिब्रेशन आवास परिसरों में 689 फ्लैट आर्थिक रूप से कमजोर वर्गों, निम्न, मध्यम और उच्च आय समूहों के लिए उपलब्ध कराए गए थे. इनमें से स्वप्नपूर्ति आवास परिसर में आर्थिक रूप से कमजोर वर्ग के लिए 93, मध्यम आय वर्ग के लिए 46 और वास्तुविहार-सेलिब्रेशन आवास परिसर में उच्च आय वर्ग के लिए 51 अतिरिक्त फ्लैट उपलब्ध सिडको द्वारा कराए गए हैं. इससे अब स्वप्नपूर्ति होम कॉम्प्लेक्स में आर्थिक रूप से कमजोर वर्ग के लिए कुल 135 फ्लैट, मध्यम आय वर्ग के लिए कुल 56 फ्लैट और वास्तुविहार-सेलिब्रेशन होम कॉम्प्लेक्स में उच्च आय वर्ग के लिए कुल 74 फ्लैट उपलब्ध हो गए हैं।

सिडको द्वारा इन फ्लैटों के लिए ऑनलाइन आवेदन पंजीकरण 25 अक्टूबर 2024 की रात 8 बजे तक और जमा राशि के भुगतान के लिए 30 अक्टूबर 2024 की रात 11.59 तक बढ़ा दी गई है. इसका ड्रा 13 नवंबर 2024 की सुबह 11 बजे आयोजित किये जाने की जानकारी सिडको प्रशासन ने शनिवार को दी है. जबकि घनसोली, खारघर और कलंबोली के सिडको की महागृहनिर्माण योजना के उपलब्ध मकानों की कम्प्यूटरीकृत ड्रा पूर्व निर्धारित कार्यक्रम के अनुसार 10 अक्टूबर 2024 को आयोजित किया जाएगा।